## खत व्यवस्थापण

लागवडीनंतर २ ते २.५ महिन्यांनी २०: २०: २० किलो नत्रः स्फुरदः पालाश प्रती एकर. पहिल्या पिकानंतर छाटणी १५ दिवसांनी २० किलो नत्र प्रती एकरी दुसर्या वर्षापासून १० मे टन शेणखत/ कंपोस्ट प्रति एकरी द्यावे. तसेच रासायनिक खते खालील वेळापत्रकानुसार द्यावे. प्रथमतः माती परीक्षण करूनच मात्रा निश्चत करावी.


| महिना | खतांची मात्रा | नत्र (कि.ग्रॅ.) | स्फुरद (कि.ग्रॅ.) | पालाश (कि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|---|
| जून | पहिली मात्रा | २४ | २४ | २४ |
| ऑगस्ट | दुसरी मात्रा | २४ | -- | -- |
| ऑक्टोबर | तिसरी मात्रा | २४ | २४ | २४ |
| डिसेंबर | चौथी मात्रा | २४ | -- | -- |
| फेब्रुवारी | पाचवी मात्रा | २४ | -- | -- |
| | | १२० | ४८ | ४८ |

## रेशीम कोष काढणी यंत्र

महाराष्ट्र हे अपारपारिक रेषीम उत्पादक राज्य असून मलबेरी व टसार रेषीम उत्पादक आहे. मराठवाड्यात बीड जिल्हा तुती लागवड व कोष उत्पादनात अग्रेसर आहे. त्यामध्ये बीड, वडवणी, गेवराई, माजलगाव या तालूक्यामध्ये रेषीम शेतीचा प्रसार झाला आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जाणीवपूर्वक कोष उत्पादनाचे तंत्रज्ञान आत्मसात केले. तंत्रज्ञानाचा अवलंब करून मराठवाड्यात सर्वात जास्त रेषीम कोष उत्पादकतेचा उच्चांक शेतकऱ्यांनी प्रस्थापित केला आहे.

**रेशीम कोष काढणी यंत्राचे फायदे :**

- कोष काढणी होत असताना कोषमधील सुटे धागे वेगळे होवून कोषाची स्वच्छता होते.
- वेळ व श्रमाच्या बचतीसोबत मजुरीच्या खर्चात मोटी बचत होते.
- योग्य वेळी व शास्त्रोक पद्धतीने कोष काढणी शक्य होते.
- हाताळनीस सोपे यंत्र.



कोष यंत्र



पाने बारीक करण्याचे यंत्र



तुती लागवड



तुतीची छाटणी

मार्गदर्शक

डॉ. ए.एस. ढवण

कुलगुरू, वनामकृवि, परभणी


प्रकाशक

डॉ. पी.जी. इंगोले

संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी

व.ना.म.कृ.वि.वि.शि.सं.प्र.क्र./२१/२०१९

# तुती लागवड तंत्रज्ञान व रेशीम कोष काढणी यंत्र



डॉ. भैयासाहेब गायकवाड
डॉ. चंद्रकांत लटपटे
डॉ. हनुमान गरुड
डॉ. संजुला भावर
डॉ. अजय किनखेडकर
कार्यक्रम समन्वयक

## कृषि विज्ञान केंद्र

खामगांव, ता.गेवराई जि.बीड

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

# तुती लागवड तंत्रज्ञान व रेशीम कोष काढणी यंत्र

## हवामान

तुती लागवडीस थंड व उष्ण दोन्हीही प्रकारचे हवामान मानवते. परंतू २५०% ते ३००% हे तापमान तुती झाडांच्या वाढीसाठी योग्य असून अशा हवामानास तुती पाल्याची जोमदार वाढ होते व चांगले पाल्याचे उत्पन्न घेता येते.

## जमीन

मध्यम, भारी, हलकी प्रकारची जमीन असली तरी तुतीची लागवड करण्यास योग्य असते. मात्र डोंगर उताराची व खारट जमीन म्हणजेच ज्या जमीनीत पानी साचून राहते किंवा पाण्याच निचरा होत नाही अशी जमीन तुती लागवडीसाठी आयोग्य असते. कारण अशा जमिनीत तुती कलमांची लागवड केली तर कलमे जास्त ओलाव्या मुळे कुजून बाद होतात. तेव्हा पाण्याचा चांगल्या प्राकरे निचरा होणाऱ्या जमीनीतच तुती लागवड करावी. कोणत्याही प्रकारच्या जमीनीत तुती लागवड करता येत असली तरी देखील काळया कसदार मातीत तुती झाडाची वाढ अतिशय झपाट्याने होत असल्याचे आढळून आले आहे. तुती झाडाच्या वाढीसाठी जमीनीतील सामु (पी.एच.) हा ६.५ ते ७ पर्यंत असणे योग्य असतो.

## तुतीच्या प्रचलीत व सुधारीत जाती

तुतीची प्रचलीत जात कनव्हा-२ अथवा एम-५ ही जात निवड पध्दतीने सन १९५० मध्ये कर्नाटक राज्यातील शासकीय कनव्हा रेशीम फार्म केन्द्रामध्ये विकसित करुन लागवड करण्यासाठी शिफारस केली आहे. या जातीची निर्मिती ओपन पराग सिंचन संकर या पध्दतीने स्थानिक म्हैसूर या जातीपासून झालेली आहे. या जातीची वाढ जलद असून आंतर मशागत हवामान व जमीन या बाबींना चांगला प्रतिसाद देते.एस- ३०,एस-३६, एस- ५४, विरवा (डी.डी.), एस-१३५ - (ओपीएस-१३५ अथवा रेनफेड सिलेक्शन १३५), व्ही -१,एस- १३, एस-३४.

## तुतीची लागवड व देखभाल

तुती बेणे तयार करणे: तुती लागवड तुतीबेण्या पासून करायची असते. त्यासाठी एम-५, एस-५४, एस-३६, व्ही - १ अशा सुधारीत जातीची बेणे वापरावीत. बेणे तयार करतांना ६ ते ८ महिने वयाच्या तुती झाडांची १० ते १२ मि.मि. जाडीच्या फांद्या निवडण्यात याव्यात व बेण्याची लांबी ६ ते ८ इंच असावी. त्यावर किमान ३ ते ४ डोळे असावेत व तुकडे करातांना धारदार कोयत्याने तुकडे करावेत कोवळया फांद्या बेणे तयार करण्यासाठी वापरु नयेत.

## तुतीचे लागवड अंतर

सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील शेतकरी तुतीची लागवड करतांना ३ X ३ अंतरावर लागवड करीत होते. परंतू आता सन १९९८ - १९९९ पासून नविन सुधारीत पध्दतीनुसार फांदी पध्दत किटक संगोपनामध्ये वापरली जात असल्यामुळे फांदी पध्दतीसाठी महाराष्ट्रात नव्यानेच रेशीम संचालनालया मार्फत तुती लागवडीसाठी ५ X २ X १ फुट अंतर मध्यम जमिनीसाठी व ६ X २ X १ भारी जमिनीसाठी तुती कलमांची लागवड करवून घेण्यात येत आहे. या पध्दतीमध्ये तुती झाडाची सर्या एकरी १०८९० इतकी बसते. त्यामुळे प्रति एकरी पाल्याच्या उत्पादनात ३ द ३फुट लागवड पध्दतीपेक्षा दुपटीने वाढ होते.

## तुती लागवड करतांना घ्यावयाची काळजी

- लागवडीकरिता किमान सहा महिने जूने व बागेस पाणी दिलेले तुती बेणे वापरावे.
- तुती बेणे छाटणी केल्यापासून २४ तासांच्या आत लागवड केल्यास त्याचा फुटवा चांगला होतो व बागेत तुट अळी पडत नाही.

- तुती बेणे छाटणी धारदार हत्याराने किंवा सिकॅटरने ३ ते ४ डोक्यावरच करावी. जास्त लांब काडी तोडू नये.
- तुतीची लागवड ५ X ३ X २ किंवा ६ X २ X १ अथवा इतर अंतरावर जोड ओळ पध्दतीनेच करावी.
- तुतीची काडी लावताना ३ डोळे जमिनीत व एकच उभा डोळा जमीनीवर ठेवावा. उलटी काडी लावू नये.
- जमिनीत वाळवी व बुरशीचा प्रादूर्भाव असल्यास तुती बेण्यास क्लोरपायरीफॉस, बाविस्टीन / डायथेन एम-४ अथवा कॉपर ऑक्सीक्लोराईड यांची बेणे प्रक्रिया करुनच लागवड करावी.
- लागवड करातांना कॅरेडिक्स,रुटेक्स किंवा आय.बी.ए. इत्यादीचा वापर करवा.
- तुती लागवडीमध्ये नैसर्गिकरित्या १० ते १५ % तुती अळी पडत असल्याने प्रती एकर किमान तुट अळी भरण्यासाठी १००० रोपांची वेगळी रोपवाटीका करावी.



तुतीचे बेणे

## अंतरमशागत व पाणी व्यवस्थापण

तुतीची लागवड केल्यानंतर अंतरमशागत करताना पहिली खुरपणी १ ते १.५ व दुसरी २ ते २.५ महिन्यानी तनानुसार करून बाग तन विरहीत ठेवावी. पहिले अडीच महिन्या पर्यन्त बैलाच्या सहयाने अंतरमशागत करु नये. कारण कलमाना ईजा होवू शकते. त्यानंतर प्रत्येक छाटनीनंतर बैलाच्या सहायाने अंतरमशागत करता येते. लागवडीनंतर लगेचच पाऊस पडला नाही तरपहिले पाणी द्यावे व त्यानंतर जमीनीच्या मगदुरानुसार ८-१० दिवसांच्या अंतराने गरजेनुसार पाणी द्यावे.